सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद धाराशिव
Email-dyceo.osmanabad@gmail.com
Phone No - 02472 / 223388

जा.क्र/जिपधा/साप्रवि/ने-२/कावी/1497/२०२३ दिनांकः-04 /१०/२०२३

# ...जाहिर आवाहन...

ग्राम विकास व पंचायत राज विभागांतर्गत धाराशिव जिल्हा परिषदांतर्गत गट-क मधील 21 संवर्गातील एकुण 453 एवढी रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबतची जाहिरात दिनांक 5 ऑगस्ट 2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीसाठी 5 ऑगस्ट 2023 ते 25 ऑगस्ट 2023 पर्यंत ऑनलाईन पध्दतीने उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात आलेले आहेत. सदर परिक्षेची संपुर्ण भरती प्रक्रिया शासनाने मान्यता दिलेल्या आय.बी.पी.एस.या कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. सदर परिक्षा अंत्यत पारदर्शक व काटेकोर पध्दतीने होणार आहे. तथापी , काही समाजविघातक प्रवृतीच्या व्यक्तीकडुन प्रलोभन दाखवुन आर्थीक फसवणुक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अशा फसवणुकीपासुन उमेदवाराने दक्षता घ्यावी. तसेच अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभणास बळी बडु नये, अन्यथा अशी फसवणुक झाल्यास शासन अथवा जिल्हा परिषद धाराशिव जबाबदार राहणार नाही. अशा प्रकारे कोणतीही व्यक्ती परीक्षे संदर्भात आर्थीक मागणी करीत असल्याबाबत निर्दशनास आल्यास त्याच्याविरुध्द जवळच्या पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्यात यावी, असे सर्व उमेदवारांना जिल्हा परिषद धाराशिव प्रशासनामार्फत आवाहन करण्यात येत आहे.

(राहुल गुप्ता भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद धाराशिव